सहकारातूनसमृध्दीकडे

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

# प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट- क संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १४/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती.

सहकार विभागातील **उच्चश्रेणी लघुलेखक,निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक** या पदांसाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त आहेत अशा उमेदवारांची **तात्पुरती गुणवत्ता यादी** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१०/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

व्यावसायिक चाचणीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची लघुलेखन व टंकलेखनची व्यावसायिक चाचणी दि.२१/०९/२०२४ व दि.२२/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली होती.

उच्चश्रेणी लघुलेखक,निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांसाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती तर व्यावसायिक चाचणीसाठी ८० गुण शासन निर्णयानुसार विहीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक चाचणी परीक्षा दि.२१/०९/२०२४ व दि.२२/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली असून, सदर परीक्षेची गुणवत्ता यादी या पत्रासोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाच्या अनुषंगाने उमेदवारांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. सदर परीक्षेमध्ये लघुलेखनासाठी कमाल गुण ८० आणि टंकलेखनासाठी कमाल गुण ४० होते. तथापि व्यावसायिक चाचणी परीक्षा कमाल ८० गुणांची असल्याने,सदर परीक्षेसाठी लघुलेखनासाठी कमाल गुण ४० आणि लघुटंकलेखनासाठी कमाल गुण ४० असे एकूण कमाल ८० गुण निर्धारित केले असून, उमेदवारांचे अंतिम गुणांकन लघुलेखनासाठी कमाल गुण ४० आणि टंकलेखनासाठी कमाल गुण ४० याप्रमाणे एकूण कमाल ८० गुणांप्रमाणे केले आहे.
२. लघुलेखन चाचणी उत्तीर्ण होणेसाठी किमान १६ गुण आणि टंकलेखन चाचणी उत्तीर्ण होणेसाठी किमान १६ गुण प्राप्त असणे आवश्यक आहेत.
३. वरील दोन्ही चाचण्यामध्ये किमान १६ गुण प्राप्त नसलेल्या उमेदवारांना अंतिम निवडीसाठी अपात्र ठरविण्यात आलेले आहे.
४. उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करतेवेळी कमाल २०० गुण विचारात घेतले जाणार असून, यामध्ये लेखी परीक्षेच्या १२० गुणांचा आणि व्यावसायिक चाचणी परीक्षेच्या ८० गुणांचा समावेश असेल.
५. प्रस्तुत परिक्षेची अंतिम निवड यादी यथावकाश संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

वरीलप्रमाणे सुचनांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

दि. ०४/१२/२०२४